**अल्पसंख्याक बहुल शासनमान्य खाजगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालये व अपंग शाळांमध्ये पायाभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना. मुदतवाढ देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**अल्पसंख्याक विकास विभाग,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**शासन निर्णय क्र. अविवि-२०१२/प्र.क्र.३६/१२/का. ६,**
**दिनांक :- २७ सप्टेंबर, २०१२**

संदर्भ :- १) अल्पसंख्यांक विकास विभाग, शासन निर्णय क्र. अविवि-२०१२/ प्र.क्र.३६/१२/ का-६, दि.१५.९.२०१२.

**प्रस्तावना :-**

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचे बाहुल्य असलेल्या राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालये व अपंग शाळांमध्ये पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अनुदान योजना सन २०१२-१३ राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेंतर्गत जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव सादर करण्याची मुदत सप्टेंबर, २०१२ पर्यंत विहित करण्यात आली होती. सदर मुदत वाढवून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचे बाहुल्य असलेल्या राज्यातील शासनमान्य खाजगी शाळा व कनिष्ठ. महाविद्यालये व अपंग शाळांमध्ये पायाभूत सोयी-सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजनेंतर्गत प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करण्याची **मुदत दि. ३०.१०.२०१२ पर्यन्त वाढविण्यात येत आहे.**

सदर शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर **www.mdd.maharashtra.gov.in** उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१२०९२७१४५९१६१६०० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( उ.सं.दांडेकर )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**कृ.मा.प...**

प्रति,

मा.राज्यपालांचे सचिव,
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव सर्व मंत्रालयीन विभाग,
महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर,
महालेखापाल १/२ (लेखापरीक्षा) , मुंबई / नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
आयुक्त, नगरपालिका प्रशासन, मुंबई,
सर्व जिल्हाधिकारी,
आयुक्त, महानगरपालिका,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका,
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
सर्व जिल्हा नियोजन अधिकारी,
सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
सर्व मंत्रालयीन विभाग,
संचालक (प्रशिक्षण),व्यवसाय व प्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय (प्रसिध्दीसाठी),
निवडनस्ती,
* पत्राने.

-------